# BK BIRLA CENTRE FOR EDUCATION

**SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS**
**SENIOR SECONDARY CO-ED DAY CUM BOYS' RESIDENTIAL SCHOOL**

**PERIODIC TEST-2( 2024-25)**

**MARATHI**

Class : XI
Date : 06-12-2024
Admission No.:

Duration : **1** Hrs
Max. Marks : **25**
Roll No.:

---

## खंड – क वाचन कौशल्य

**प्र 1 अपठीत गदयांश :–** **(5)**

**खालील गदयांश काळजीपूर्वक वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :–**

आपले व निसर्गाचे अगदी जीवाभावाचे नाते आहे. इथली सजीवसृष्टी निसर्गावरच अवलंबून असते. निसर्गातून आपल्याला ब–याच गोष्टीं मिळतात. अन्न,वस्त्र,निवारा या आपल्या मूलभूत गरजा निसर्गामुळे पूर्ण होतात. मानवाने आज जी काही प्रगती केली आहे ती निसर्गाच्याच मदतीने केली आहे. इथली झाडे,नदया कसलीही अपेक्षा न ठेवता दुस–याला सतत देत राहण्याची शिकवण आपल्याला देतात. निःस्वार्थी वृत्तीने आपण इतरांना मदत करावी,हे ज्ञान आपल्याला निसर्गातून मिळते. निसर्गाच्या सानिध्यात असताना आपल्याला प्रसन्न वाटते. आपल्यातील कलागुणांना वाव मिळतो. तसेच, आपल्यातील सुप्तगुणांचा विकास होतो. इथले पर्वत,डोंगर आपल्याला कठीण परिस्थितीतही खचून न जाता धैर्याने उभे राहण्याची शिकवण देतात. आकाशातील सूर्य,चंद्र,तारे हे आपल्याला अविरतपणे कार्य करण्याची शिकवण देतात. समुद्राकडून अथांगता आपल्याला शिकायला मिळते. निसर्गातील प्रत्येक गोष्ट आपल्याला शिकवायचा पूर्ण प्रयत्न करीत असते. निसर्ग बोलून दाखवत नसला तरी आपल्या रोजच्या कृतीतून तो सारे काही आपल्याला शिकवत असतो. उत्क्रांतीच्या प्रत्येक टप्पावर निसर्गाने मानवाला मदत केली आहे.

प्रश्नः–

1 आपल्या मुलभूत गरजा कोणत्या आहेत ?

**(क)** काम –धंदा **(ख)** नोकरी–व्यवसाय **(ग)** अन्न,वस्त्र,निवारा

2 कोण दुस–याला देत राहण्याची शिकवण देतात ?

**(क)** झाडे–नदया **(ख)** आई–बाबा **(ग)** गुरु

3 निसर्ग या शब्दासाठी समानार्थी शब्द निवडा ?

**(क)** वातावरण **(ख)** सृष्टी **(ग)** हवामान

4 आपणास अथंगता कोणाकडून शिकायला मिळते ?

**(क)** नदी कडून **(ख)** सरोवरा कडून **(ग)** समुद्राकडून

5 गदयांशास योग्य शीर्षक दया ?

## खंड – ख व्याकरण

प्र 2 खालील वाक्यांचे प्रकार ओळखा – **(2)**

1 अरेरे ! खूप वाईट वाटले मला !

2 हा देखावा खूप सुंदर आहे.

**प्र 3 पुढील वाक्यांचे काळ ओळखा –** **(2)**

1 शब्दकोडे सोडवल्यामुळे भाशिक कौशल्य वाढते.

2 विश्वकोश पाहिल्याने तुमचा फायदाच होईल.

**प्र 4 समास ओळखा –** **(2)**

1 शेतीवाडी

2 विनधास्त

**प्र 5 समानार्थी शब्द लिहा –** **(2)**

1 विदयुत

2 विदयालय

**प्र 6 कारणे लिहा :–** **(2)**

1 फक्त ॲल्युमिनियमचेच वाळे पक्ष्यांच्या पायात अडकवतात, कारण ––––––

2 पावसाच्या सरी कोसळव्यात, कारण –––––––––

**खंड – ग साहित्य**

**प्र 6 प्रश्नोत्तरेः– अभिव्यक्ती ( स्वगत ) कोणतेही दोन** **(2 x3=6)**

1 वसंत ऋतूच्या आगमनाने होणारे सृष्टीत होणारे बदल तुमच्या निरिक्षणाने लिहा –

2 तुमच्या मते मानवी जीवन व पक्षी जीवन यांच्यातील महत्त्वाचे साधर्म्य सोदाहरण लिहा–

3 पुन्हा एकदा
चमकावी वीज
उतरावी खाली
भिनावी रक्तात या ओळींचा संदर्भासहित भावार्थ स्पष्ट कराः–

**खंड – घ लेखन**

**प्र 7 पत्र लेखन –** **(4)**

शाळेचा रस्ता दुरूस्त करण्यासाठी शिरगाव ग्रामपंचायतीच्या सरपंचास पत्र लिहा :–

**किंवा**

खेळाचे साहित्य मागविण्यासाठी राज स्पोर्ट या दुकानदाराच्रूा व्यवस्थापकास पत्र लिहा :–

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––